





कनिष्ठ विभाग

# माहिती पुस्तिका

2020-2021

सर्वोदय शिक्षण मंडळ द्वारा संचालित

# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

REACCREDITED AT 'A' GRADE BY NAAC (CGPA OF 3.05, THIRD CYCLE)

मनोहरभाई पटेल परिसर, गंजवार्ड, चंद्रपूर-442402, फोन (07172) 255778

**Visit us at :** www. spm.ac.in. **Email :** chdspm@gmail.com



क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षीस वितरण करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.पी. इंगोले, शांताराम पोटदुखे विधी महाविद्यालयाची प्राचार्या डॉ. सौ. अंजली हस्तक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. स्वप्नील माधमशेट्टीवार व मान्यवर.




व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन कार्यक्रमात विचार व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले व मान्यवर




महाविद्यालयात आयोजित शिक्षक व पालक मेळाव्यात मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले व मान्यवर

# आमचे श्रद्धेय



स्व. श्री शांतारामजी पोटदुखे यांना

# विनम्र आदरांजली !

अजात शत्रू म्हणूनी,गौरवितात सारे । सर्वांस आपला तू, विझती जिथे निखारे ।।

## प्राचार्याचे मनोगत



सन २०२०-२१ ची माहिती पुस्तिका आपल्याला देताना आनंद होत आहे. आपण सर्व जण २०२० ह्या वर्षात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने प्रभावित झाले आहोत. इतर क्षेत्रासहित शैक्षणिक क्षेत्राला सुद्धा याची झळ पोहोचलेली दिसते. मागील सत्राच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता त्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्याचे निश्चित झाले आहे. अंतिम वर्गात शिकणाऱ्या व त्यांचे अगोदरचे सर्व वर्गाच्या परीक्षा पास असणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येणार आहे. त्यानंतर त्याच्या पदव्युत्तर व इतर वर्गात प्रवेश निश्चित करता येणार आहे.

शासनाच्या आदेशानुसार ह्या वर्षी एकमेकांपासून भौतिक अंतर पाळणे, दिवसातून अनेकदा स्वच्छ हात धुणे, मास्क वापरणे, सॅनिटायजरचा वापर करून स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यायची आहे. पालकांनी आपल्या पाल्याला महाविद्यालयात वावरताना ह्या शिस्तीचे पालन करण्यासंदर्भात सूचना द्यावी. यावर्षी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्याचा निर्णय झाला आहे.

महाविद्यालय शैक्षणिक व इतर उपक्रमात नेहमीच अग्रेसर राहिले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. महाविद्यालयातील ६० विद्यार्थी ह्या सत्रात गुणवत्ता यादीत झळकले असून अनेक विद्यार्थ्यांनी क्रीडा, सांस्कृतिक, इंद्रधनुष्य, अविष्कार, युवाभूषण सारख्या स्पर्धेत नैपुण्य मिळवले आहे. एन.एस.एस.च्या माध्यमातून अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात आले असून, एन.सी.सी.चा विद्यार्थी दिल्ली येथे झालेल्या प्रजासत्ताक दिन परेडमध्ये भाग घेतला आहे. पदव्युत्तर शिक्षणानंतर १५ विषयांमध्ये संशोधनाची संधी सुद्धा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून १२०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

इंडिया टुडे मॅगझिनतर्फे नुकत्याचा जाहिर झालेल्या राष्ट्रीय क्रमवारीमध्ये फॅशन डिझाईनिंग विभाग ३५ व्या, कला शाखा ५३ व्या, विज्ञान शाखा ७८ व्या, बी.सी.ए. शाखा ८२ व्या तर वाणिज्य शाखा ११३ व्या स्थानावर आहे. ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

विद्यार्थी, पालक ह्या सर्वांकडून प्रशासनाला सहकार्य मिळेल या अपेक्षेत तुमच्या शैक्षणिक उन्नतीसाठी शुभेच्छा देतो.

**डॉ. आर. पी. इंगोले**
प्राचार्य

सर्वोदय शिक्षण मंडळ द्वारा संचालित

# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
# कनिष्ठ विभाग

**कला, वाणिज्य, विज्ञान व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एम.सी.व्ही.सी.)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर– संलग्न

# माहिती पुस्तिका
## (PROSPECTUS)

**सत्र २०२० –२०२१**

किंमत रू.
२५/+१०/–=३५/–

महाविद्यालयाचे फोन कार्यालय : (०७१७२) २५५७७८, २५६५३७
फॅक्स : (०७१७२) २५६५३७, निवास : २५५ ०२०
**Visit us at** : www.spm.ac.in. **Email :** chdspm@gmail.com

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद
विश्वविद्यालय अनुदान आयोग का स्वायत्त संस्थान
NATIONAL ASSESSMENT AND ACCREDITATION COUNCIL
*An Autonomous Institution of the University Grants Commission*

# Certificate of Accreditation

The Executive Committee of the
National Assessment and Accreditation Council
on the recommendation of the duly appointed
Peer Team is pleased to declare the
Sarvodaya Shikshan Mandal's
Sardar Patel Mahavidyalaya
Ganj Ward, Chandrapur, affiliated to Gondwana University, Maharashtra as
Accredited
with CGPA of 3.05 on seven point scale
at A grade
valid up to January 22, 2022

Date : January 23, 2017

Director

# *Vision*

*To establish the college as a centre of academic excellence. To impart education to the students of rural area and inculcate in them an urge for research, provide them an opportunity to progress, create in them sense of responsibility towards society and bring them into education main stream of India.*

# *Mission*

*To elevate the morale of student, instill in them the confidence, to excel in competitive environment and imbibe moral value to develop into a good human being.*

# एका दृष्टीक्षेपात अभ्यासक्रम



# सत्र २०१९–२० मधील उपक्रमाचा अहवाल

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टीकोनातून शैक्षणिक सत्र २०१९–२० मध्ये सांस्कृतीक विभागाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अगदी सत्राच्या सुरूवातील रक्षाबंधनाचे निमित्त साधून दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'राखी मेकींग स्पर्धा' घेण्यात आली यात तयार केलेल्या राख्या दि. १ सप्टेंबर २०१९ रोजी 'भामल वनातील वृक्षरक्षाबंधन' या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षांना बांधण्यात आल्या. दि. ५ सप्टेंबर डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांकरीता स्वयंशासनाचा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये सर्व शाखेतील विद्यार्थ्यांनी उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून सहभाग घेतला. निसर्गाची ओळख व्हावी या हेतुने सर्पमीत्र श्री शशांक मुंजमकर यांचे सर्पाबद्दलचे ज्ञान, अज्ञान यावर ३० नोव्हें. २०१९ ला व्याख्यान घेण्यात आले.

उन्नत भारत अभियानांतर्गत ४ डिसेंबर २०१९ रोजी खास पुण्याहून आलेले सारा कंपनी व जे.एम.डी. महामंडळाचे व्यवस्थापक श्री. सागर कुळकर्णी यांचे विद्यार्थ्यांकरीता व्यवसाय मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित केले. दि. १४ डिसेंबर २०१९ ला शिक्षक पालक मेळावा घेण्यांत आला. व्यक्तीमत्त्व विकासाच्या दृष्टीने दि. २७ सप्टेंबर २०१९ ला खास जपावरून आलेले री. वैभव पंकज मेहता यांचे 'व्यक्तीमत्त्व विकास' यावर मार्गदर्शन घेण्यात आले.

दि. २१ डिसेंबर २०१९ ला 'जिल्हास्तरीय एकल नृत्य स्पर्धा घेण्यात आली तसेच दि. ०५ जानेवारी २०२० ला चंद्रपूरातील सर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरीता 'सामान्य ज्ञान परिक्षा' यशस्वीपणे घेण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी तसेच शाळेंनी सहभाग घेतला.

दरवर्षीप्रमाणे दि. २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२० दरम्यान क्रीडा व सांस्कृतीक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये विद्यार्थ्यांकरीता चित्रकला, रांगोळी , सलाद डेकोरेशन, प्रश्नमंजुषा, एकल गीत गायन, समूह गीत गायन, वेशभूषा, एकल नृत्य व समुह नृत्य स्पर्धा इ. कार्यक्रम घेण्यात आले.

शारीरिक शिक्षण व खेळ विभागतर्फे ''महाराष्ट्र शासनाच्या युवक व सेवा संचालनालय पुणे'' अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणाऱ्या विविध शालेय, क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाचे संघ भाग घेतात. सन २०१९–२० मध्ये झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धेत कबड्डी, क्रिकेट, नेट बॉल, बॉल–बॅडमिंटन , किक–बॉल, कराटे, रायफल शुटींग, बॅडमिन्टन, हॅण्डबॉल या

संघानी जिल्हा स्तरावर विजय मिळविला व विभागीय व राज्य स्तरीय स्पर्धेत संघ व खेळांडूनी भाग घेतला. खेळाडूंच्या उत्कृष्ट खेळामुळे १) शुभम क्रिष्णा निर्गुडवार– वर्ग १२ वा एम.सी.व्ही.सी. व २) कु. पूर्वा प्रकाश तुमाने वर्ग १२ वा वाणिज्य या खेळाडूंची महाराष्ट्र राज्याच्या अनुक्रमे क्रिकेट व हॅण्डबॉल संघात निवड झाली व त्यांनी राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचे नेतृत्व केले.

वर्षभरात झालेल्या अनेक शालेय क्रीडा स्पर्धेत महाविद्यालय विजयाचे सातत्य राखत आहे. अनेक वर्षापासून जिल्ह्यात गुणानुक्रमे प्रथम क्रमांकावर राहत असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने मागील तीन वर्षापासून १००००० रु. खेळाडूंच्या प्रोत्साहनासाठी क्रीडा अनुदान देऊन महाविद्यालयाचा गौरव करीत आहे.

# महाविद्यालयाची आकर्षणे

## १) स्वर्गीय रमादेवी ओंकारनाथ शर्मा ग्रंथालय

हे ग्रंथालय सरदार पटेल महाविद्यालयाचेच नव्हे तर चंद्रपूर शहराचे भूषण ठरलेले आहे. त्यासाठी संस्थापक प्राचार्य डॉ.ओंकारनाथ शर्मा यांनी २५ हजारांची उदार देणगी १९७० ला दिली आहे. ग्रंथालयात अद्यावत वाचन कक्ष असून तेथे मराठी–हिंदी–इंग्रजी विषयाची अद्यावत नियतकालिके उपलब्ध असतात तसेच विद्यार्थ्यांकरीता स्वतंत्र संगणक कक्ष आणि सोबतच इंटरनेटची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याशिवाय अनेक मान्यवर नागरिकांनी आपल्या खाजगी ग्रंथालयातील मौल्यवान पुस्तके दिली आहेत. त्याचप्रमाणे ग्रंथालयात पुस्तक पेढी (Book Bank) ही सुरू करण्यात आली आहे. पुस्तक पेढी व ग्रंथालयाचे नियम ग्रंथालयात उपलब्ध आहेत. सत्र २०१७१८ च्या सत्रापर्यंत महाविद्यालयातील ग्रंथालयात ७७,३६२ पुस्तके उपलब्ध आहे. महाविद्यालयात M-OPAC सुविधा उपलब्ध असुन प्ले–स्टोअर वरून डाऊनलोड करून विद्यार्थी उपलब्ध पुस्तकांची माहिती करून घेऊ शकतात.

## २) छात्रसेना N.C.C.

विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयामध्ये N.C.C. छात्रसेनेची व्यवस्था करण्यात आली आहे. २०१३–१४ पासून N.C.C. कोर्सचा कालावधी तीन वर्षाचा करण्यात आलेला आहे. N.C.C. घेणा–या विद्यार्थी व विद्यार्थिनींना विद्यापीठाकडून वेगळे १० अतिरिक्त गुण Incentive Marks) देण्यात येणार आहेत.

तसेच 'C' Certificate उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी लष्करी सेवेमध्ये (Military Service) गेल्यास भारत सरकार तर्फे त्यांना (Direct Commission) सेकंड लेफ्टनंट चे पद देण्यात येते. त्याकरिता महाविद्यालयामध्ये–मुलींकरिता–८० जागा आणि मुलांकरिता–१०८ जागा ठेवण्यात आल्या आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनींची निवड प्रत्यक्ष मुलाखत घेऊन करण्यात येते.

## ३) राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) व प्रौढ शिक्षण

मुलामुलींच्या कर्तृत्वाला वाव मिळण्यासाठी आणि ग्रामीण भागातील सामुदायिक जीवनाशी एकरूप

होऊन त्यांचे सोबत काम करणे, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे, त्याच प्रमाणे राष्ट्रीय कार्याला मदत करणे या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य महाविद्यालयात सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण आरोग्य शिक्षण, स्वच्छता, वनसंरक्षण, जलसंवर्धन, पर्यावरण इ. बाबीवर भर देऊन राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत दर वर्षी शिबिरे आयोजित केली जातात. सत्र २०१६–१७ ह्या वर्षात महाविद्यालयीन तथा गोंडवाना विद्यापीठ स्तरीय शिबिर घेण्यात आले. सत्र २०१७–१८ ह्या वर्षात राज्यस्तरीय शिबिर घेण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा. एन.एस.एस. घेणा–या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून अतिरिक्त दहा (१०) गुण देण्यात येतात.

### ४) महाविद्यालयीन पत्रिका – शब्दगंधा

दरवर्षी महाविद्यालयाचे वार्षिक 'शब्दगंधा' प्रकाशित होते. त्यात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील लेख, कविता, कथा व निबंध प्रकाशित होतात. वर्षभराचे वेगवेगळ्या मंडळांच्या कार्याचे इतिवृत्तही यात असते. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले साहित्य दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत संबंधित प्राध्यापकांकडे द्यावेत.

### ५) स्पर्धापरीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र

वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांबाबत माहिती देऊन विद्यार्थ्यांसाठी वर्ग आयोजित केले जातात. तसेच व्यवसायासंबंधी मार्गदर्शनही केले जाते. इच्छुक विद्याथ्र्यांनी या केंद्राच्या संबंधित प्राध्यापकांशी संपर्क साधावा.

### ६) विशेष मार्गदर्शन वर्ग

A) Remedial Coaching Classes for S.C., S.T., Minority Communities

विद्यापीठ अनुदान आयोग दिल्ली मार्फत चालविण्यात येणाऱ्या Remedial Coaching Classes अंतर्गत महाविद्यालयात एस.सी., एस.टी. व अल्पसंख्यांक समाजाच्या कमकुवत मुला/मुलीं करिता मोफत मार्गदर्शन वर्ग चालविण्यात येतात –

B) Spoken English Classes - महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांकरिता स्पोकन इंग्रजीचे विशेष वर्ग चालविले जातात.

C) NET, SET - परीक्षेकरिता विशेष मार्गदर्शन– NET, SET - – परीक्षेकरिता विविध विषयांचे मार्गदर्शन वर्ग चालविले जातात.

## ७) Internet ची सोय

महाविद्यालयातील स्व. ओंकारनाथ शर्मा ग्रंथालयात विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयीन वेळेत मोफत Internet ची सोय करण्यात आली.

## ८) खेळ

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळांची व्यवस्था केली आहे. कवायत, खेळ व शारीरिक शिक्षण प्रशिक्षकांचे नियंत्रणाखाली होईल.

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या खेळाडूंकरिता २५ अतिरिक्त गुण दिलेले आहेत.

## ९) सायकल स्टैंड

संपूर्ण सत्रासाठी सायकल व स्कूटर स्टॅन्ड निशुल्क आहे. विद्यार्थ्यांनी स्वत:चे जबाबदारीवर सायकल किंवा स्कूटर ठेवावे. महाविद्यालयावर कोणत्याच प्रकारची जबाबदारी राहणार नाही. ज्या विद्यार्थ्यांकडे वाहन चालवण्याचा परवाना (Licences) नसेल त्यांना महाविद्यालयाबाबत गाडी ठेवता येणार नाही.

## १०) सरदार पटेल महाविद्यालय ग्राहक भंडार

महाविद्यालयात, सरदार पटेल महाविद्यालय ग्राहक सहकारी भंडार असून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना घेता येईल. त्याकरिता प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क रु. १ (एक रुपया) व सभासद शुल्क रु. ५/– (पाच रुपये) अनिवार्यपणे प्रवेश घेताना भरावे लागेल व सर्व विद्यार्थी ग्राहक भंडाराचे नाममात्र सभासद राहतील.

## ११) कला दालन

विद्यार्थ्यांच्या कला व लेखन गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी सांस्कृतिक विभागांतर्गत २००२–२००३ या शैक्षणिक सत्रापासून कला दालन (Art Gallery) हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येतो. उत्कृष्ट लेख, कविता तसेच चित्र यांना महाविद्यालयाच्या वतीने बक्षिसे दिली जातात.

## १२) क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव ( Sports and Cultural Festival)

विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना प्रोत्साहीत करण्यासाठी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात

महाविद्यालयात क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवा अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. यशस्वी स्पर्धकांना महाविद्यालयातर्फे पारितोषिके देण्यात येतात.

**१३) वसतीगृह** (Hostel)

विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाची सोय उपलब्ध आहे. विद्यार्थिनीची प्रवेश क्षमता ११५ आहे. या विषयीची चौकशी कार्यालयात व्यवस्थापन विभागात करावी.

**१४) रक्त संकलन केंद्र** (Blood Collection Centre)

सत्र २००७–२००८ पासून महाविद्यालयात स्वतंत्र स्वर्गीय शंकरलाल जयस्वाल रक्त संकलन केंद्र सुरू करण्यात आले असून यात प्रत्येक महिण्यात विभागणीहाय महाविद्यालयीन विद्यार्थी रक्तदान करतात. अशा प्रकारचा अभिनव उपक्रम सुरू करणारे एकमेव महाविद्यालय आहे.

**१५) कनिष्ठ विज्ञान विभाग (Jr. Science Stream)**

वर्ग ११ वी तसेच १२ वी विज्ञानाचे Chemistry, Physics, Maths आणि Biology चे अभ्यासक्रम e-Learning या सोयीचा वापर करून, तयारी करवुन घेण्यात येईल. त्याचप्रमाणे NEET/JEE स्पर्धा परीक्षेची पुर्व तयारी सतत घेण्यात येईल, अद्यावत e-Learning चा वापर पुर्व परीक्षेच्या तयारीकरीता करण्यात येईल.

**शैक्षणिक सत्र २०२०–२०२१ : ११ व १२ कला/वाणिज्य/विज्ञान/ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एम.सी.व्ही.सी.) कनिष्ठ महाविद्यालयाची वेळ १२.०० ते ६.०० राहील.**

महाविद्यालयाच्या शिक्षणाचे माध्यम कला विभाग–मराठी व वाणिज्य विभाग–मराठी व इंग्रजी आणि विज्ञान विभाग–इंग्रजी राहील. महाविद्यालयीन वेळात बदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्यांचा राहील.

# आचार संहिता

१) महाविद्यालयाच्या आवारात व आवाराबाहेर महाविद्यालयाच्या शिस्तीला व व्यवस्थेला बाधक होईल असे वर्तन विद्यार्थ्यांच्या हातून घडता कामा नये.

२) महाविद्यालयातील कार्यक्रम, स्वातंत्र्यदिन आणि गणराज्य दिनासारख्या राष्ट्रीय उत्सवप्रसंगी सर्वांची उपस्थिती आवश्यक आहे. अनुपस्थितीवर कडक कार्यवाही करण्यात येईल. कार्यक्रम व समारंभ प्रसंगी पांढरा पोषाख परिधान करून आले पाहिजे.

३) प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी महाविद्यालयात येणारा पाहुणा याचा आदर राखणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. यापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्याला कडक शासन होईल.

४) प्राध्यापक वर्गात जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वर्गात गेले पाहिजे. प्राध्यापक वर्गातून निघून जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वर्ग सोडता कामा नये.

५) तास नसताना विद्यार्थ्यांनी वहांड्यात किंवा पटांगणात फिरू नये. वाचनकक्षात व ग्रंथालयात वेळ कामी लावावा. विद्यार्थीनींनी त्यांच्या असलेल्या कॉमन रुममध्ये बसावे.

६) प्राध्यापकांच्या परवानगी शिवाय विद्यार्थ्यांनी आपल्या विषयाव्यतिरिक्त इतर विषयांच्या वर्गात बसता कामा नये.

७) निरनिराळ्या शैक्षणिक सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती व आवेदन पत्रातील मजकूर सर्वस्वी त्यांनाच बंधनकारक राहील. सवलत रद्द झाल्यास नियमाप्रमाणे शुल्क देण्याचे बंधन विद्यार्थ्यांवर राहील.

८) सभ्यता व शिष्टाचार यांचे कडक पालन करून संस्थेचा लौकिक वाढविण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी करावे.

९) महाविद्यालयात शुल्क व इतर दंड ताबडतोब दिला पाहिजे. अडचण असल्यास प्राचार्यांकडे लेखी आवेदनपत्र सादर करावे.

१०) महाविद्यालयात विवादात्मक प्रश्न उद्भवल्यास त्याबाबत प्राचार्यांचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

११) महाविद्यालयात मादक पदार्थ सेवन करून येऊ नये.( पान, तंबाखू, गुटखा, सिगरेट मद्य इ.)

१२) महाविद्यालयात L.T.D. विरोधातील समिती कार्यरत असून दोषी आढळणाऱ्या विरूद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३) विद्यार्थ्याने प्रत्येक तास करणे आवश्यक राहील. सर्व तासिकांना उपस्थित असणे आवश्यक आहे. सत्रातील उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास दंड आकारण्यात येईल.

१४) विद्यार्थ्याने महाविद्यालयीन परीसरात मोबाईलचा वापर करू नये. मोबाईलचा वापर करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई केल्या जाईल.

१५) शासकीय कामाव्यतिरीक्त विद्यार्थ्यांची वैयक्तीक माहिती प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणालाही देण्यात येणार नाही.

## विशेष सुचना

१) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सवलती व शिष्यवृत्ती या संबंधीचे अर्ज संबंधित लिपिकाकडे निर्धारित वेळेपूर्वी सादर होणे आवश्यक आहे.

२) नागपूर विभागीय शिक्षण मंडळाच्या परीक्षांकरीता भरावयाचे अर्ज ठराविक तारखेच्या आत कार्यालयात सादर होणे अनिवार्य आहे.

३) ११ वी व १२ वी कला, वाणिज्य व विज्ञान विद्या शाखेतील सर्व वर्गांना प्रवेश समिती मार्फत प्रवेश देण्यात येईल

४) प्रत्येक विद्यार्थ्याने नोटीस बोर्ड दररोज पहावे व त्यावरील सूचना लक्षात घ्याव्या.

५) चालू सत्रापासून सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना गणवेश आवश्यक राहील.

६) प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्याने स्वत: हजर राहणे आवश्यक आहे. त्याशिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

७)- A.T.K.T. सुचना :- वर्ग १० वी नापास विद्यार्थ्यांना, वर्ग ११ वी मध्ये प्रवेश देण्यात येईल. परंतु सदर विद्यार्थी लगतच्या वर्षातील (२०१९-२०२०) मध्ये कोणत्याही दोन विषयात नापास असावा. तसेच १० वी मध्ये गणित विषयात नापास विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन देण्यात येईल.

**कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता माध्यमिक शाळा संहिता विभाग आठ नुसार**

(For Junior College Students Secondary School Code Section Viii)

## विद्यार्थ्यांसाठी शिस्तीची मार्गदर्शक तत्वे

**(अनुच्छेद ५६-५)**

जर एखादा विद्यार्थी हेतुपरस्परणे आज्ञाभंग करत असेल किंवा अपायकारक गोष्टी करीत असेल किंवा परीक्षेत अवैध मार्गाचा अवलंब करत असेल किंवा गंभीर स्वरूपाच्या गैरशिस्तीचे दुर्वर्तन करीत असेल, कॉलेज प्रमुखाचे मत या विद्यार्थ्यांच्या बेशिस्तीचा आणि दुर्वर्तनाचा प्रभाव अन्य विद्यार्थ्यांवर पडत असल्याचे होत असेल तर प्राचार्य अशा विद्यार्थ्यांना विशिष्ट कालावधीसाठी किंवा कायमचे महाविद्यालयातून काढून टाकू शकतील. काढण्याच्या कारणाची लेखी स्वरूपात नोंद असावी आणि या कार्यवाहीची माहिती प्रमुखांनी विद्यार्थ्याला ताबडतोब सात दिवसाच्या आत द्यावी यात त्याच्यावर केलेल्या कार्यवाहीच्या कारणांची विस्तृत माहिती असावी.

## विद्यार्थ्यांनी पाळावयाचे नियम
(Rule of Conduct for Students)

१) प्रवेशाच्या वेळी, प्रत्येक विद्यार्थ्याने कॉलेजकडून केलेल्या ओळखत्रावर ते प्रवेशपत्रावर स्वत:चा पासपोर्ट साईजचा फोटो काळजीपूर्वक चिकटवून ओळखपत्र नेहमी स्वत:जवळ सुरक्षित बाळगावे. म्हणजे कोणी विचारणा केल्यास ते त्वरित दाखवता येईल.

२) विद्यार्थ्याने कॉलेजमध्ये कोणत्याही प्रकारची संघटना व मंडळे स्थापन करू नये.

३) विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अशैक्षणिक चळवळीत (Non Academic) विध्वंसक कृतीत (Violent -ctivities) भाग घेऊ नये.

४) प्राचार्याने खालील बाबीवरून कोणत्याही विद्यार्थ्याचे नाव कॉलेज पटावरून काढून टाकण्याचे सर्व अधिकार स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

अ) कॉलेजचे देणे (College Dues) देण्यास असमर्थ ठरत असल्यास,

ब) शैक्षणिक प्रगतीत आणि हजेरीत कमी पडत असल्यास,

क) प्राचार्याच्या मते त्यांची वर्तणूक असमाधानकारक वाटत असल्यास

ड) विद्यार्थी आचार संहितेचे व नियमांचे उल्लंघन करीत असल्यास त्याच्या गुन्ह्यांच्या गंभीरतेचे स्वरूप लक्षात घेऊन शिक्षा करण्यात येईल व या संदर्भात प्राचार्याचा निर्णय अंतिम राहील.

ई) वर्ग सुरू असतांना विद्यार्थी वऱ्हांड्यात फिरत असल्यास,

फ) महाविद्यालयात पान, तंबाखू, सिगरेट, गुटखा इ. सेवन करतांना आढळल्यास

५) ह्या माहिती पुस्तिकेतील माहिती सूचनेशिवाय बदलविल्या व वाढविल्या जाऊ शकते.

६) महाविद्यालयीन परीसरात मोबाइलचा सर्रास वापर टाळावा, अन्यथा कारवाई करण्यात येईल.

## ओळखपत्र (Identity Card)

महाविद्यालयात प्रवेश घेताच प्रत्येक विद्यार्थ्यास ओळखपत्र (खवशपींळीूं उरीव) मिळेल. हे ओळखपत्र विद्याथ्र्याने नेहमी जवळ बाळगावे. त्यावर स्वत:चा फोटो आणि प्राचार्यांची किंवा उपप्राचार्याची सही असणे आवश्यक आहे. ग्रंथालयातील पुस्तके, प्रयोग शाळेतील उपकरणे किंवा खेळाचे साहित्य हे ओळखपत्र दाखविल्यावरच मिळू शकते. चालू सत्रात ओळखपत्र हरविल्यास ५० रुपये कार्यालयात भरून नवीन ओळखपत्र मिळू शकेल. प्रवेश मिळाल्यापासून पंधरा दिवसाचे आत ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. सप्टेंबरनंतर ओळखपत्र तयार केल्यास ५० रु. दंड लागेल आणि डिसेंबर ते मार्चपर्यंत तयार केल्यास १०० रु. दंड लागेल.

## योग्यता प्रमाणपत्र (कनिष्ठ महाविद्यालयाकरिता)
## (ELIGIBILITY CERTIFIC?TE FOR JUNIOR COLLEGE)

ज्या मुलांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशिवाय दुस–या कोणत्याही बोडची परिक्षा पास केली असल्यास कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी किंवा १२ वी मध्ये प्रवेश घेतांना नागपूर विभागीय शिक्षण मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

# प्रवेशासाठी नियम

महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाच्या विद्यार्थ्याने माहिती पुस्तिकेत जोडलेला अर्ज भरून प्रवेश समितीकडे सादर करावा.

१) सोबत खालील कागदपत्राच्या मूळ प्रती असणे आवश्यक आहे.

अ) शालांत (S.S.C.) परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

ब) गुणपत्रिकेच्या दोन प्रती. एक मूळ व दुसरी सत्यपत्र.

क) पूर्वीचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र.

ड) आधार कार्डची सत्यप्रत

२) प्रवेश अर्जासोबत संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

३) प्रवेश अर्जासोबत जोडलेले मूळ प्रमाणपत्र महाविद्यालयाने प्रवेश नाकारल्यास परत केले जातील.

४) प्राचार्याच्या मंजूरीशिवाय प्रवेश निश्चित होणार नाही.

५) विद्यार्थ्यांना दिलेला प्रवेश तात्पुरता राहील. नागपूर बोर्डाची अनुभन मिळाल्यानंतर तो प्रवेश अंतिम समजण्यात येईल.

६) प्रवेश शुल्क भरल्यावर विद्यार्थ्याने स्वत:हुन प्रवेश रद्द केल्यास त्याने भरलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

७) शैक्षणिक सत्रामध्ये महाविद्यालय सोडल्यास महाविद्यालयाचे पूर्ण सत्राचे शुल्क भरावे लागेल. फक्त सरकारी नोकरी असलेल्या पालकांची बदली झाल्यास त्याबाबत सूट देण्यात येईल.

८) प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती शिष्यवृत्तीसाठी विविध नमुन्यांमध्ये अर्ज सादर करावे लागेल. त्याशिवाय विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्तीची सवलत मिळणार नाही.

९) प्रवेश घेतल्यापासून ७ दिवसानंतर घेतलेल्या विषयांत किंवा शाखेत बदल करून दिला जाणार नाही

१०) निर्धारित वेळेपूर्वी आर्थिक सवलतीचे शिष्यवृत्तीचे अर्ज सादर केले नसल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. त्याला महाविद्यालयाची पूर्ण फी भरावी लागले.

११) प्रवेशासाठी स्वत: हजर राहणे आवश्यक आहे त्या शिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

## विशेष सूचना (Special Note)

महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन व विद्यार्थी संघटनेचे कोणतेही कार्यक्रम होणार नाही. विद्यार्थी व्यक्तिश: किंवा संघटनेमार्फत किंवा सामूहिकरित्या याविषयी मागणी करणार नाही.

## विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती व शिष्यवृत्त्या

**सूचना :** कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनींना एकाच वेळी फक्त एकच शिष्यवृत्तीचा किंवा सवलतीचा फायदा मिळू शकेल. शिष्यवृत्ती व सवलत यांचा निर्देश खाली केला आहे. याबाबत अधिक चौकशी कार्यालयात करावी.

१) भारत सरकारच्या राष्ट्रीय शिष्यवृत्त्या.

२) भारत सरकारकडून राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्त्या योजना,

३) प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलांकरिता भारत सरकारच्या गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्त्या.

४) बिगर हिंदी भाषिक प्रांतातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिक पुढील हिंदीच्या अभ्यासाकरिता शिष्यवृत्त्या.

५) स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलामुलींना मिळणाच्या शैक्षणिक सवलती फी माफी शिष्यवृत्त्या आणि पुस्तकासाठी अनुदान.

६) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलामुलींसाठी राज्य सरकारची फी माफीची सवलत.

७) प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा शिक्षकांच्या मुलामुलींना राज्यसरकारची फी सवलतीची योजना.

८) सैनिकांच्या मुलांना राज्य सरकारच्या फी माफीची सवलत.

९) अशासकीय महाविद्यालयातील बिना मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारच्या गुणवत्तेवर आधारलेल्या सवलती

१०) अपंग शिष्यवृत्त्या.

११) वर्ग ११ वी १२ वी च्या मुलींना शिक्षण फि मध्ये सुट मिळेल. विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश घेतल्यानंतर एक आठवड्याच्या आत दिल्यास हि सवलत मिळेल.

१२) शिष्यवृत्ती अर्ज विद्यार्थ्यांनी पद्धतीने भरावयाचे आहे. त्यामध्ये तांत्रीक चुकीमुळे शिष्यवृत्ती नामंजुर झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

१३) नविन शिष्यवृत्ती नियमानुसार शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने त्यांनी त्यापैकी शिक्षण शुल्काची रक्कम ताबडतोब महाविद्यालयात जमा करावयाचे आहे.

१४) चालू शैक्षणिक सत्र २०२०–२१ मध्ये प्रवेश व त्याबाबतची प्रक्रिया व फी (शुल्क) ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येईल.

१५) चालू सत्राचे २०२०–२१ मध्ये वर्ग ऑनलाईन पद्धतीने व मोबाईल ॲपच्या सहाय्याने तासीका व शिक्षण पूर्ण केले जाईल.

## विद्यार्थी मदत निधी

वरील सवलती व्यतिरिक्त महाविद्यालयाकडून हुशार व होत ९० विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना मदतनिधी म्हणून महाविद्यालयीन शुल्क, पुस्तके व त्यासाठी मदत देण्यात येईल. यासाठी प्राचार्यांकडे दिनांक २१ जानेवारी पर्यंत नियोजित आवेदन पत्र आवश्यक माहितीनिशी सादर करावे. यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही. शिष्यवृत्ती किंवा शैक्षणिक सवलत असणा–या विद्यार्थ्यांनी यासाठी अर्ज करू नये. प्राचार्यांकडे आलेल्या आवेदन पत्राचा विचार त्यांनी नेमलेल्या एका जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होईल.

वरील सवलती शिष्यवृत्ती त्याचे नीट परिशीलन करून विद्यार्थ्याने त्यासंबंधीचे आवश्यक कागदपत्र कार्यालयात द्यावेत. विद्यार्थ्याने भरलेल्या चुकीच्या माहितीमुळे किंवा अन्य कारणाने शासनाने सवलतीचे किंवा शिष्यवृत्तीचे आवेदनपत्र अस्वीकृत केल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही व त्या विद्यार्थ्याला पूर्ण शुल्क भरावे लागेल.

# उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (M.C.V.C.) शुल्क
## (H.S.C. Vocational) (सत्र २०२०–२०२१)

| विवरण | वर्ग ११ वी | वर्ग १२ वी |
|---|---|---|
| प्रवेश शुल्क | रू. २०/ | – |
| सत्र शुल्क | रू. ४०/– | रू ५०/ |
| प्रयोगशाळा शुल्क | रू. ८०/ | रू १००/ |
| ग्रंथालय शुल्क | रू. २०/ | रू २०/ |
| ओळखपत्र शुल्क | रू २०/ | रू २०/ |
| ग्रंथालय तिकीट | रू १०/ | रु १०/ |
| महाविद्यालयीन परिक्षा शुल्क | रू १००/ | रू १००/ |
| वाचन कक्ष | रू २०/ | रू २०/– |
| मॅगझिन शुल्क | रू. १०/ | रू १०/ |
| शिक्षण शुल्क | रू. २४०/ | रू ३००/– |
| ऑन लाईन फीज | रू. ५०/– | रू. ५०/– |

**टिप :** १) जे विद्यार्थी फी माफीचा किंवा शिष्यवृत्तीचा अर्ज भरणार नाही त्यांना शिक्षण शुल्क भरावे लागेल.

२) शासनानुसार फी मध्ये कोणताही बदल झाल्यास तो लागू राहील,

# कनिष्ठ महाविद्यालयीन शुल्क

**कला, वाणिज्य व विज्ञान शाखेकरिता ( सत्र २०२०– २०२१)**
**(नागपूर विभागीय बोर्डाने ठरवून दिलेल्या शुल्कानुसार)**

| शुल्काचे विवरण | विज्ञान शाखा | | कला शाखा | | वाणिज्य शाखा | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वर्ग ११ वी | वर्ग १२ वी | वर्ग ११ वी | वर्ग १२ वी | वर्ग ११ वी | वर्ग १२ वी |
| नोंदणी शुल्क | रू. १५.०० | रू.१५.०० | रू. १५.०० | रू. १५.०० | रू. १५.०० | रू. १५.०० |
| प्रवेश फी रू. १६.०० | -- | रू. १६.०० | -- | रू.१६.०० | -- | |
| ओळखपत्र फी | रू. २०.०० | रू.२०.०० | रू. १०.०० | रू. २०.०० | रू.२०.०० | रू२०.०० |
| ग्रंथालय तिकीट | रू. १०.०० | रू.१०.०० | रू. १ ०.०० | रू. १०.०० | रू. १०.०० | रू१०.०० |
| विद्यार्थी सहाय्यता निधी | -- | -- | रू. १५.०० | -- | -- | -- |
| वाचन कक्ष | -- | -- | रू. १०.०० | -- | -- | -- |
| सत्र फी | रू. ३२.०० | रू. ३६.०० | रू.३२.०० | रू.३६.०० | रू. ३२.०० | रू. ३६.०० |
| शिक्षण शुल्क | १९२.०० | रू.२१६.०० | रू.१९२.०० | रू. २१६.०० | रू.१९२.०० | रू.२१६.०० |
| मॅगझिन फी | रू.३०.०० | रू. ३०.०० | रू. ३०.०० | रू. ३०.०० | रू. ३०.०० | रू.३०.०० |
| ग्रंथालय फी | -- | -- | -- | -- | -- | -- |
| महाविद्यालयीन परिक्षा शुल्क | रू. १००.०० | रू.११८.०० | -- | रू. ११८.०० | रू.१००.०० | रू.११८.०० |
| प्रयोगशाळा शुल्क | रू.१५०.०० | रू.१००.०० | रू. ५०.०० | रू.५०.०० | रू.१५० | रू.१५०.०० |

**टिप: ज्या विद्यार्थांनी भारत सरकार शिष्यवृत्ती व फी माफी करिता (E.B.C.) अर्ज महाविद्यालयाला सादर न केल्यास त्यांना ‘सत्र फी’ व ’शिक्षण शुल्क जमा करणे आवश्यक आहे.**

विनाअनुदानीत विज्ञान शाखा व वाणिज्य शाखा (इंग्रजी माध्यम) यांची फी वेगळी राहील. त्याकरिता कोणतीही फी सवलत राहणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्यांनी पूर्ण फी देऊनच प्रवेश घ्यावे.

ऐच्छिक विषय माहीती व तंत्रज्ञान (Information Technology), संगणक शास्त्र (Computer Science) तसेच इलेक्ट्रानिक (Electronics) हा विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार वेगळी फी द्यावी लागेल. ही फी सर्वच सवलत प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही द्यावी लागेल.

# महाविद्यालयीन अभ्यासक्रम ११ व १२ वी करिता

## कला शाखा (Art Faculty)

| क्रमांक | 'अ' तुकडी (विषय) | 'ब' तुकडी (विषय) |
|---|---|---|
| १ | इंग्रजी | इंग्रजी |
| २ | मराठी | मराठी / हिन्दी |
| ३ | इतिहास / सहकार | समाजशास्त्र |
| ४ | राज्यशास्त्र | अर्थशास्त्र |
| ५ | समाजशास्त्र | राज्यशास्त्र/ संरक्षणशास्त्र |
| ६ | भूगोल | भूगोल/आहारशास्त्र |

टिप :: १) २०१९-२०२० पासून वर्ग ११ वी व १२ वी करिता शिक्षण मंडळाद्वारे मान्य करण्यात आल्याप्रमाणे, 'पर्यावरण शिक्षण' आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयात गुणपत्रिकेत श्रेणी देण्यात येईल.

२) वर्ग १२ वी मध्ये आहारशास्त्र विषयाचे ऐवजी वस्त्रशास्त्र विषय राहील.

## वाणिज्य शाखा (वर्ग ११ वी व १२ वी)

| मराठी माध्यम (अनुदानीत | इंग्रजी माध्यम (विनाअनुदानीत) |
|---|---|
| इंग्रजी | English |
| मराठी/हिन्दी/माहीती तंत्रज्ञान (I.T.)<br>बँकींग -I/मार्केटिंग-I | Marathi/Hindi/I.T. Banking-I/Marketing-II |
| पुस्तपालन व लेखाकर्म<br>सचिवाची कार्यपद्धती | Book-Keeping & Accountancy<br>Secretarial Practice |
| व्यापार संघटन व व्यवस्थापन | Organisation of Commerce & Management |
| अर्थशास्त्र/ बँकींग -II/ मार्केटिंग-II | Economics /Banking-II/ Marketing-II |

**टिप :** १) २०१९-२०२० पासून वर्ग ११ वी व १२ वी करिता शिक्षण मंडळाद्वारे मान्य करण्यात आल्याप्रमाणे,'पर्यावरण शिक्षण' (Environment Education) आणि 'आरोग्य व शारीरिक शिक्षण (Health Physical Education) या विषयात गुणपत्रिकेत श्रेणी देण्यात येईल.

२) वर्ग ११ वी ला घेतलेले विषयच १२ वी करिता राहतील. त्यात बदल करता येणार नाही.

३) (I.T.) विषय घेणाऱ्या विद्याथ्र्यास MSCIT मधून सुट देण्यात आली आहे.

४) वाणीज्य (मराठी माध्यम) मधील दुसरी तुकडी विनाअनुदानीत आहे.

# उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम

## Class 11th (H.S.C. Vocational) (Old M.C.V.C.)

| Accounting -and Office Management | Logistics -and Supply Chain Management | Food Products Technology |
|---|---|---|
| इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| मराठी/ हिन्दी | मराठी/ हिन्दी | मराठी/ हिन्दी |
| पायाभूत अभ्यासक्रम (General Foun. Course) | पायाभूत अभ्यासक्रम (General Foun. Course) | पायाभूत अभ्यासक्रम (General Foun. Course) |
| Office Management & Organization | Purchase Management | Bakery Technology |
| Fundamental of Accounting | Logistics and Warehousing | Cookery Technology |
| Fundamental of Costing & Auditing | Banking and Accounting | Indian Culsines and Hygiene |

## Class 12th (H.S.C. Vocational) (Old M.C.V.C.)

| Accounting and Office Management | Logistics -and Supply Chain Management | Food Products Technology |
|---|---|---|
| इंग्रजी | इंग्रजी | इंग्रजी |
| मराठी/ हिन्दी | मराठी/ हिन्दी | मराठी/ हिन्दी |
| पायाभूत अभ्यासक्रम | पायाभूत अभ्यासक्रम | पायाभूत अभ्यासक्रम |
| (General Foun. Course) | (General Foun. Course) | (General Foun. Course) |
| Office motivation | Retail Management | Adv. Bakery Technology |
| Advance financial Accounting | Security and safety Equipements | Advanced Cookery Technology |
| Advance costing and auditing | Supply Chain Management | Food costing and International cuisine |

सत्र २०१९-२०२० पासून वर्ग ११ वी व १२ वी करिता शिक्षण मंडळाद्वारे मान्य करण्यात आल्याप्रमाणे, 'पर्यावरण शिक्षण' (Environment Education) आणि 'आरोग्य व शारीरिक शिक्षण (Health Physical Education) या विषयात गुणपत्रिकेत श्रेणी देण्यात येईल.

# ११ वी १२ वी SCIENCE FACULTY (विनाअनुदानीत)

| Section A (Bio focal Science) | Section B General Science | Section C General Science |
|---|---|---|
| 1) English | 1) English | 1) English |
| 2) Electronics/CS-I | 2) Marathi / Hindi /I. T. | 2) Marathi/Hindi |
| 3) Physics | 3) Physics | 3) Physics |
| 4) Chemistry | 4) Chemistry | 4) Chemistry |
| 5) Mathematics | 5) Mathematics | 5) Mathematics/I.T |
| 6) Electronics-II/ Computer Sci.-ll | 6) Biology | 6) Biology |

**टिप ::**

१) २०१९–२०२० पासुन वर्ग ११ वी व १२ वी करिता शिक्षण मंडळाद्वारे मान्य करण्यात आल्याप्रमाणे, 'पर्यावरण शिक्षण' (Environment Education) आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण (Health Physical Education) या विषयात गुणपत्रिकेत श्रेणी देण्यात येईल.

२) Computer Science and Electronics are optional subjects For Marathi/Hindi/I.T. Biology.

३) शिक्षणाचे माध्यम इंग्रजी राहील.

४) आय. टी. (I.T.) व कॉम्प्युटर सायन्स (Computer Science) विषय घेणा–या विद्याथ्यास MSCIT मधुन सुट देण्यात आली आहे.

५) Section A व Section B विना अनुदानीत तत्वावर आणि Section C स्वयं अर्थ सहाय्य तत्वावर माननीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता प्राप्त.

६) For Jr. Science Stream We have e-Learning facility to learn Physics, Chemistry, Math and Biology.

## आवेदन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे

१) गुणपत्रिकेची सत्यप्रतिलिपी २ प्रती

२) शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (Original T.C.)

३) जातीचे प्रमाणपत्र (शिष्यवृती धारक विद्याथ्र्यांकरीता)

४) पासपोर्ट साईज फोटो

५) ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशिवाय दुस–या कोणत्याही बोडची परिक्षा पास केली असल्यास कनिष्ठ महाविद्यालयात ११ वी किंवा १२ वी मध्ये प्रवेश घेतांना नागपूर विभागीय शिक्षण मंडळाचे योग्यता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६) आधार कार्डची सत्यप्रत (Xerox) अर्जासोबत जोडणे.

सूचना :– १) उपरोक्त प्रमाणपत्रांच्या सांक्षाकित प्रती (Xerox) स्वत: जवळ ठेवाव्यात. एकदा कार्यालयात जमा केलेले कोणतेही प्रमाणपत्र परत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

२) परिक्षेच्या वेळापत्रकाचे नियोजनाचा अधिकार शिक्षण विभागाकडे राहील.

# कनिष्ठ महाविद्यालय वार्षिक वेळापत्रक (सत्र २०२०-२०२१)

| महिना | वेळापत्रक |
|---|---|
| जुन | वर्ग ११ वी व वर्ग १२ वी प्रवेश प्रक्रिया |
| जुलै | पालक-प्राचार्य-शिक्षक सभा आयोजन |
| ऑगस्ट | सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन |
| सप्टेंबर | शिक्षक दिनानिमीत्य कार्यक्रमाचे आयोजन वर्ग ११ प्रथम घटक चाचणी परीक्षा |
| ऑक्टोबर व | जिल्हास्तरीय नृत्य स्पर्धा व व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन |
| नोव्हेंबर | वर्ग ११ वी प्रथम सत्र परिक्षा |
| डिसेंबर | महाविद्यालयीन क्रीडा व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन |
| जानेवारी | वर्ग ११ वी द्वितीय घटक चाचणी परीक्षा<br>वर्ग १२ वी सराव परिक्षा<br>स्पर्धात्मक परीक्षा संबंधी मार्गदर्शन |
| फेब्रुवारी व मार्च | वर्ग १२ वी प्रात्यक्षिक परिक्षा<br>वर्ग १२ वी बोर्ड (HSC) परिक्षा<br>वर्ग ११ वीचे उजळणी वर्ग |
| एप्रिल | वर्ग ११ वी द्वितीय सत्र परिक्षा व निकाल |

**टिप :**

**महाविद्यालयीन वेळापत्रकात बदल करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्यांचा राहील तसेच वर्ग ११ वी च्या परिक्षेचे वेळापत्रक शिक्षण विभागाच्या वेळापत्रकाप्रमाणे राहील.**

# कनिष्ठ महाविद्यालय विभाग

प्राचार्य डॉ. आर.पी. इंगोले, M.Com, B.Ed, M.Phil, Ph.D.

## कला विभाग

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. पी.आर. साहू, M.A.(Po. Sci.),M.A(Soci.), M.A.(Eco.), B.Ed. | समाजशास्त्र/अर्थशास्त्र |
| २) | प्रा. सी. जे. खैरवार, M. A, B.Ed. | हिंदी |
| ३) | प्रा. कु. एस.एस. श्रीरामे, M.A.,B.Ed. | मराठी |
| ४) | प्रा. कु. एस.एम. कटकमवार, M.A., (Eng, Pol. Sci), B.Ed | इंग्रजी |
| ५) | प्रा. पी.डब्लू.कुचनकर, M.A., (Pol. Sci, soc), B.Ed | राज्यशास्त्र |
| ६) | प्रा.डॉ.एम.एम. काकडे, M.A., (आहारशास्त्र),B.Ed., M. Phil, Ph.D. | आहारशास्त्र |

## वाणिज्य विभाग

१) प्रा. सौ. अंजली संदीप मामीडवार (तासीका तत्वानुसार), M.A.(Eng.) His.B.Ed

२) प्रा. कु. निरूपा गोगुलवार (तासीका तत्वानुसार), M.Com. B.Ed

३) प्रा. सौ. किरण आर. तोष्णीवाल (तासीका तत्वानुसार), M.Com. B.Ed

४) कु. शितल चव्हाण (तासीका तत्वानुसार), M.Com. M.-.B.Ed.PhD.

५) प्रा. कु. के. बी. डोडाणी (तासीका तत्वानुसार), M.Com.

६) प्रा. कु. योगीता खोब्रागडे (तासीका तत्वानुसार), M.Com. B.Ed. M.Phil

७) प्रा. कु. श्रृती के. गौरकार (तासीका तत्वानुसार), M.A. (English)

८) प्रा. किशोर भावरकर (तासीका तत्वानुसार) M.Com. B.Ed.

**वाणिज्य शाखा व्यवसाय अभ्यासक्रम (द्विलक्षी अभ्यासक्रम) –**

**विपनण व विक्री कला (Marketing and Salesmanship)**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. कांचन रामटेके, M.Com. B.Ed. M.B.A. | शिक्षक |
| २) | रिक्त पद | शिक्षक (प्रात्यक्षिक) |

**अधिकोषन (Banking)**

| | | |
|---|---|---|
| १) | रिक्त पद | शिक्षक |
| २) | प्रा. शिफाली कुमरवार, M.Com., B.Ed., M. Phil. | शिक्षक (प्रात्याक्षिक) |

# प्राध्यापक वृंद (उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम) एम.सी.व्ही.सी. विभाग

## A. Accounting & Office Management

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. अमोल जी. तडसे, M.Com.,M.Phil., M.A. (His.), M.A. (Eco.) | शिक्षक (विभाग प्रमुख) |
| २) | प्रा. व्ही. डब्ल्यु. राऊत, M.Com., B.Ed., M.Phil. | शिक्षक (प्रात्याक्षिक) |

## B. Logistics and Supply Chain Management :

| | | |
|---|---|---|
| १) | रिक्त पद | शिक्षक |
| २) | रिक्त पद | शिक्षक (प्रात्याक्षिक) |

## C. Food Products Technology :

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. श्रीमती नेहा दिघे, M.Sc. | शिक्षक |
| २) | प्रा. लता साखरकर, B.Sc. | शिक्षक (प्रात्याक्षिक) |

# विज्ञान शाखा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. राजकुमार सु. चंद्रात्रे (विभाग प्रमुख), M.Sc (Comp. Sci.) B.Ed. | Computer Sci. |
| २. | प्रा.आशिष रा जांबुतकर, M.Sc. (Physics), M.Phil.,(Physics) M.Ed. | Physics |
| ३. | प्रा. सतिश जी. खोबरागडे, M.Sc. (Electronics Maths), MBA, B.Ed. SET | Electronics |
| ४. | प्रा. नितीन प्र. डांगरे, M.A (English) B.Ed. | English |
| ५. | प्रा. कु. खुशनुदा शेख, M.A (Hindi), B.Ed., M.A. (Soc.) | Hindi |
| ६. | प्रा. स्नेहा देशमुख, M.Sc., B.Ed. (Biology), | Biology |
| ७. | प्रा. अनंता मल्लेलवार, M.A. (Marathi, History) | Marathi |
| ८. | प्रा. कु. रेखा खनके, M.Sc. (Chemistry), B.Ed. | Chemistry |
| ९. | प्रा. ए.डी. दुधे, M.Sc., B.Ed. | Physics |
| १०. | प्रा. नितीन पाडेवार, M.Sc. (Mathematics) B.Ed. | Mathematics |
| ११. | प्रा. संतोषी कासनगोट्टूवार, M.Sc., B.Ed. | Chemistry |
| १२. | प्रा. अंकिता जांगडे B.E. | I.T. |
| १३. | प्रा. आसावरी जीवतोडे M.Sc., B.Ed. | Mathematics |

## सर्वोदय शिक्षण मंडळ कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती सुधाताई शांतारामजी पोटदुखे | अध्यक्ष |
| २) | श्री. अरविंद सावकार पोरेड्डीवार | कार्याध्यक्ष |
| ३) | श्री. पुरूषोत्तम ह. धनकर | उपाध्यक्ष |
| ४) | श्री. रमेश रामचंद्रराव मामीडवार | उपाध्यक्ष |
| ५) | श्री. मनोहरराव आर. तारकुंडे | कोषाध्यक्ष |
| ६) | श्री.भरत उर्फ प्रशांत शां. पोटदुखे | सचिव |
| ७) | प्राचार्य डॉ. किर्तीवर्धन दिक्षीत | सहसचिव |
| ८) | श्री. राकेश एस. पटेल | सदस्य |
| ९) | श्री. सुदर्शन निमकर | सदस्य |
| १०) | श्रीमती सगुणाबाई पेंटारामा तलांडी | सदस्या |
| ११) | श्री. एस. के. रमजान | सदस्य |

## शाळा समिती पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती सुधाताई शांतारामजी पोटदुखे | अध्यक्ष |
| २) | श्री. रमेश आर. मामीडवार | उपाध्यक्ष |
| ३) | श्री. भरत उर्फ प्रशांत शां. पोटदुखे | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. किर्तीवर्धन दिक्षित | सदस्य |
| ५) | प्राचार्य, डॉ. राजेश इंगोले | सचिव |
| ६) | श्री. मोहन बी. वनकर | कर्मचारी प्रतिनिधी |

# महाविद्यालयीन विकास समिती वर्ष २०१६–२०२०

| | | |
|---|---|---|
| ०१) | श्रीमती सुधाताई शांताराम पोटदुखे | अध्यक्षा |
| ०२) | श्री. पुरूषोत्तम ह. धनकर | उपाध्यक्ष |
| ०३) | श्री. प्रशांत शां. पोटदुखे | सचिव |
| ०४) | श्री. मोहनभाई हिराबाई हिरालाल | सदस्य |
| ०५) | प्राचार्य अनिल शिंदे | सदस्य |
| ०६) | श्री. हेमंत कुलकर्णी | सदस्य |
| ०७) | नामवंत वैज्ञानिक | रिक्त |
| ०८) | प्राचार्य डॉ. आर.पी. इंगोले | सदस्य सचिव |
| ०९) | डॉ. स्वप्नील व्ही. माधमशेट्टीवार | सदस्य |
| १०) | डॉ. प्रकाश शेंडे | सदस्य |
| ११) | डॉ. व्ही.डी. बन्सोड (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १२) | डॉ. एस.बी. किशोर (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १३) | डॉ. पद्मरेखा धनकर (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १४) | श्री. प्रमोद नारळे (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सदस्य |
| १५) | विद्यार्थी प्रतिनिधी | रिक्त |

# सार्वजनिक सुट्ट्या–२०२०

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. सार्वसु. १११९/प्र.क्र. ६९/कार्या. २९. भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक ३९/१/६८, जेयुडीएल/तीन दिनांक ८ मे १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्यात सन २०२० सालासाठी खाली नमुद केलेल्या दिवशी सार्वजनिक सुट्ट्या गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांना व गोंडवाना विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर सवेकांना जाहीर करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| ०१ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | १९ फेब्रुवारी २०१९ | बुधवार |
| ०२ | महाशिवरात्री | २१ फेब्रुवारी २०२० | शुक्रवार |
| ०३ | होळी (दुसरा दिवस) | १० मार्च २०२० | मंगळवार |
| ०४ | गुढीपाडवा | २५ मार्च २०२० | बुधवार |
| ०५ | रामनवमी | २ एप्रिल २०२० | गुरुवार |
| ०६ | महावीर जयंती | ६ एप्रिल २०२० | सोमवार |
| ०७ | गुड फ्रायडे | १० एप्रिल २०२० | शुक्रवार |
| ०८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | १४ एप्रिल २०२० | मंगळवार |
| ०९ | महाराष्ट्र दिन | १ मे २०२० | शुक्रवार |
| १० | बुध्द पौणिमा | ७ मे २०२० | गुरुवार |
| ११ | रमझान ईद (ईद–उल–फितर) (शव्वल–१) | २५ मे २०२० | सोमवार |
| १२ | बकरी ईद (ईद–उल– झुआ) | १ ऑगस्ट २०२० | शनिवार |
| १३ | स्वातंत्र दिन | १५ ऑगस्ट २०२० | शनिवार |
| १४ | गणेशचतुर्थी | २२ ऑगस्ट २०२० | शनिवार |
| १५ | महात्मा गांधी जयंती | २ ऑक्टोबर २०२० | शुक्रवार |
| १६. | ईद–ए–मिलाद | ३० ऑक्टोबर २०२० | शुक्रवार |
| १७ | दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) | १४ नोव्हेंबर २०२० | शनिवार |
| १८. | दिवाळी (बलिप्रतिपदा) | १६ नोव्हेंबर २०२० | सोमवार |
| १९ | गुरुनानक जयंती | ३० नोव्हेंबर २०२० | सोमवार |
| २० | ख्रिसमस | २५ डिसेंबर २०२० | शुक्रवार |

**अ. खालील सुट्टया रविवारी येतात.**

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार |
|---|---|---|---|
| ०१ | प्रजासत्ताक दिन | २६ जानेवारी २०२० | रविवार |
| ०२. | पारशी नववर्ष दिन (शहेनशाही) | १६ ऑगस्ट २०२० | रविवार |
| ०३ | मोहरम | ३० ऑगस्ट २०२० | रविवार |
| ०४ | दसरा | २५ ऑक्टोबर २०२० | रविवार |

**टीप:–**मा, विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर तसेच मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली हे ज्या स्थानिक सुट्टया जाहीर करतील अशा सुट्टया तसेच वेळोवेळी जाहीर करण्यात येणाऱ्या स्थानिक सुट्टया विद्यापीठ कार्यालयास लागु राहतील.

**सुधारित आदेश**

संदर्भिय आदेश क्रमांक १ चे अनुषंगाने सन २०१९ या दिनदर्शिका वर्गाकरिता चंद्रपूर जिल्ह्यात खालीलप्रमाणे स्थानिक सुट्ट्या जाहिर करण्यात आलेल्या होत्या.

| अ.क्र. | सुट्टीचा दिवस | इंग्रजी तारीख | वार | स्थानिक सुट्ट्याचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ०१ | होळी | ०६ मार्च २०२० | सोमवार | चंद्रपूर |
| ०२. | धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन | १६ ऑक्टोबर २०२० | शुक्रवार | चंद्रपूर |
| ०३ | धनत्रोयदशी | १३ नोव्हेंबर | शुक्रवार | चंद्रपूर |

## संपर्क (कनिष्ठ महाविद्यालया करीता)

| | | |
|---|---|---|
| १) | ओळखपत्र | उपप्राचार्य |
| २). | प्रवेश (कला,वाणिज्य, विज्ञान) | श्री. टि. बी. वाढई (कनिष्ठ लिपीक) |
| ३) | प्रवेश(एम.सि.व्ही.सि.) | कु. बि. के. जीवतोडे (कनिष्ठ लिपीक) |
| ४) | शिष्यवृत्ती, इ.बी.सी.सवलत | श्री. सचिन मेश्राम |
| ५) | क्रिडा विभाग | रिक्त पद |
| ६) | सांस्कृतीक विभाग | प्रा. व्हि.डब्लू राऊत |
| ७) | ग्रंथालय | डॉ. संजय भुत्तमवार (ग्रंथपाल) |

सर्वोदय शिक्षण मंडळ संचालित

# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

## कनिष्ठ महाविद्यालय प्रवेश अर्ज २०२० – २०२१

No.

**विद्यार्थ्याने भरावयाची माहिती**

विभाग : कला/वाणिज्य/विज्ञान/उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (एम.सी.व्ही.सी.)

**शिक्षणाचे माध्यम :** कला (मराठी माध्यम)

वाणिज्य : (मराठी व इंग्रजी माध्यम), विज्ञान : (इंगजी माध्यम)

प्रवेश वर्ग ........................................

**आवश्यक विषय :**

**१. इंग्रजी (English)**

**२. पर्यावरण शिक्षण (Environmental Education)**

**३. आरोग्य व शारिरीक शिक्षण (Health Physical Edu.)**

**ऐच्छिक विषय : (Optional Subjects)**

**४.**

**५.**

**६.**

**७.**

**८.**

**कार्यालयाने भरावयाची माहिती**

प्रवेश क्रमांक : ..................................................

वर्ग (Class) ..................................................

विभाग (Section) ..................................................

प्रवेश दिनांक : ..................................................

पात्रता परीक्षेतील शेकडा गुण %

सादर केलेली प्रमाणपत्रे : ..................................................

भरलेले शुल्क रु. पावती क्र.

**अलीकडील रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिकटवावे. ओळखपत्रासाठी एक सोबत द्यावे.**

| स्वाक्षरी | स्वाक्षरी | स्वाक्षरी |
|---|---|---|
| **प्रवेश समिती प्रमुख** | **प्राचार्य, स.प.म. चंद्रपूर** | **प्रवेश लिपिक** |

## विद्यार्थ्यांने स्वत: भरावयाची माहिती

१. संपूर्ण नांव ______________________

(आडनाव) (नाव) (वडिलांचे नाव)

Name (In English Block Letter) ______________________

२ जन्म तारीख (आकड्यात) (DOB) __________ (अक्षरात)(Words) __________ (स्त्री/पुरुष) (M/F) ______

३. वय (Age) ______ रक्तगट (Blood Group). ______ धर्म (Religion) ______ जात (Cast) ______

४. विद्यार्थ्यांच्या जातीची वर्गवारी : SC/ST/NT/V JNT/SBC/OBC/OPEN Physical Handicapped : Yes / No (enclose the Certificate)

५ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकरीता– १) राष्ट्रीयकृत बँकेचे नाव ..................................... २) बचत खाते क्रमांक

६. आपला आधार कार्ड क्रमांक (Card No.)

७. (अ) वडीलांचे पूर्ण नांव ______________ (Fathers Full Name) (ब) आईचे पूर्ण नांव ______________ (Mothers Full Name)

स्थायी पत्ता (मूळ गावचा) ______________________ (Permanent Address)

______________ वडीलांचा मोबाईल क्र. ______________ विद्यार्थ्यांच्या मोबाईल क्र. ______________

वडीलांचा/आईचा व्यवसाय ______________ वार्षिक उत्पन्न ______________

८. पालकांचे पूर्ण नाव ______________________

स्थानिक पत्ता ______________________

९. वसतिगृहात प्रवेश होय / नाही

१०. विवाहित / अविवाहित होय / नाही

११. उत्तीर्ण परीक्षेसंबंधी माहिती : वर्ग ______________ वर्ष मार्च / ऑक्टो. २०

१२. गेल्या परीक्षेला कोठून बसलात (शाळेचे / महाविद्यालयाचे नाव) ______________

१३. शाळा / महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (T.C.) महाविद्यालयात आहे/नाही. ______________

असल्यास वर्ग ______________ वर्ष ______________

१४. महाविद्यालयीन फि सवलत E.B.C. / PT.C. / Caste Declaration / GO.I.

१५. विद्यार्थी नोकरी करतो काय ? होय/नाही – असल्यास प्रमाणपत्र जोडावे.

१६. अ) मतदान यादीमध्ये आपल्या नावाची नोंद झाली आहे/नाही. ब) असल्यास मतदार कार्ड क्र..............................

१७. आवेदकाने दिलेली परीक्षा:(खालील माहिती पूर्ण भरावी.) गुण %

| परीक्षेचे नाव | परीक्षा क्रमांक | बोर्ड | वर्ष/मार्च/ऑक्टो | शेकडा |
|---|---|---|---|---|
| एस.एस.सी/ १० वी | | | | |
| ११ वी | | | | |

**१७. ११ वी/१२ वी ला घेतलेले विषय (आवश्यक): १. इंग्रजी** (English) **२. पर्यावरण शिक्षण (Environmental Education)**

**३. आरोग्य व शारिरीक शिक्षण (Health & Physical Edu.)**

**ऐच्छिक विषय** (४) (५) (६)

(७) (८) (९)

## विद्यार्थ्यांचे प्रतिज्ञापत्र

**प्राचार्य महोदय,**

१. मी (पुर्ण नाव)________________________________________

प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, प्रवेश अर्जात भरलेली माहिती संपूर्ण सत्य आहे. मी माहितीपत्रक काळजीपूर्वक वाचले आहे आणि त्यातील मजकूर मला समजला आहे.

I (Full Name) ________________________________________ declared that the above information is true and trust worthy.

२. महाविद्यालयात सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या सोयी सवलती मला मान्य आहेत. त्याव्यतिरिक्त इतर कोणतीही नवीन मागणी मी करणार नाही.

I agree with the present facilities provided to me. I will not claim for any other

३. वर्गात व महाविद्यालयाचे परिसरात मी कोणतेही मादक पदार्थ, गुटका, पान, तंबाखु, धुम्रपान इत्यादींचे सेवन करणार नाही. उलट महाविद्यालयातील स्वच्छता व मालमत्ता याची काळजी घेईन.

I assure you that I'll not consume any type of narcotic drugs in collage campus. I promise to maintain the cleanliness and security of college property in the college premises

४. महाविद्यालयाच्या नियमांचा मी भंग केल्यास महाविद्यालयाने केलेली कारवाई मला मान्य राहील.

I agree with the rules and regulations made by college and punishment is acceptable if rules broken.

५. सत्र २०११–२०१२ पासुन शासकीय आदेशानुसार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती राष्ट्रीयकृत बँकेद्वारे देण्यात येईल त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे खाते उघडून प्रवेश घेतेवेळी आवेदन पत्रात व शिष्यवृत्ती अर्ज सादर करतांना स्वताचे बचत खाते क्रमांक देणे मला अनिवार्य राहील. त्याशिवाय मला शिष्यवृत्ती मिळणार नाही. व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

As per government order the scholarship will be issued by the Nationalized Bank concerned student will open the saving account in any of the Nationalized Bank.

वरिल १ ते ५ व महाविद्यालयाची आचारसंहिता आणि वेळोवेळी प्राचार्याने केलेल्या सूचनांचे पालन न केल्यास व नियमांचे उल्लंघन केल्यास माझा प्रवेश रद्द करण्यास मी पात्र आहे. यास माझी तक्रार राहणार नाही.

Above rules and regulations are restricted to the student, otherwise my college admission will be canceled.

I will be responsible for this

**१३. महाविद्यालयाने ठरवीलेला गणवेश मला बंधनकारक राहील.**

**चंद्रपूर / दि. ....................** **विद्यार्थ्यांची स्वाक्षरी**

## वडिलांचे पालकांचे प्रतिज्ञापत्र

**प्राचार्य महोदय,**

मी घोषित करतो की अर्जदार माझा मुलगा/ मुलगी/ पाल्य आहे व त्याने भरलेली माहिती बरोबर आहे. मी हमी देतो की तो/ ती महाविद्यालयाच्या सर्व नियमांचे पालन करेल. तो/ती अशैक्षणिक आंदोलने व बेशिस्तीपासून काळजीपूर्वक दूर राहील. गैरवर्तनाबद्दल आपला निर्णय मला मान्य राहील.

**चंद्रपूर / दि. ....................** **वडिलांची/पालकांची स्वाक्षरी**



महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय एकल नृत्य स्पर्धेचे विजेते स्पर्धक व मान्यवर



महाविद्यालयात आयोजित आंतरशालेय सामान्यज्ञान परीक्षेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, मान्यवर व विजते



क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत नृत्य सादर करतांना महाविद्यालयीन विद्यार्थीनी

# सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

(कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र, गृहशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, जनसंवाद–पदवी व पदव्युत्तर विभाग)




महाविद्यालयाची मुख्य इमारत




महाविद्यालयातील ग्रंथालय, संगणकशास्त्र, व  पदव्युत्तर विभाग इमारत

PRINTING AND DESIGN : SIVALI GRAPHICS, NAGPUR. MOB. 9881712149